# प्रभु तरुण

| वर्ष ५६ | अंक ०१ | मुंबई | १६ सप्टेंबर, २०२२ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*( स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## प्रभुमनांचा राजा हाचि...!

**—सुहासिनी कीर्तिकर**

### कृतज्ञ स्मरण



**श्री. सुहास विष्णुपंत कोठारे**

आपल्या प्रभुतरुणाच्या वाढदिवसानिमित्ताने मी गेल्या संपादकीयात असे म्हटले की पुढील अंकी 'मागून पुढे चालू' राहील माझे मनोगत, माझे विचार. पण माझे तत्संबंधी विचार व्यक्त व्हायला पुढील अंकही आहेच की नय? कारण या संपादकीयात मला झलक दाखवायची आहे ती प्रभुतरुणाचा वाढदिवस कसा थाटामाटात साजरा झाला त्याची. हो! दिनांक २१-८-२२ रोजी 'सुबा इंटरनॅशनल' मध्ये प्रभुतरुणप्रेमींच्या उपस्थितीत हा दिवस साजरा झाला. सकाळी साडेदहा ते दुपारी अडीच असा प्रदीर्घ 'समयो पातला' होता. प्रमुख पाहुणे होते सॉलि. राजन मोतीराम जयकर आणि त्यांच्या पत्नी ॲड. केतकी. त्यांच्या हस्ते श्री. सुहास कोठारे आणि श्री. विहंग नायकांच्या प्रतिमांना पुष्पहार घालण्यात आले. या प्रतिमांमधील त्यांची चित्रे श्रीनल कोठारेच्या कुंचल्यातून उतरलेली आहेत. आपल्या अध्यक्षीय भाषणात राजन यांनी पाठारे प्रभु मासिकांचा इतिहास समोर ठेवला. अतिशय अभ्यासपूर्ण असे ते भाषण होते; तर केतकी यांनी 'प्रभुतरुणाने मला लिहीते केले' असा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. राजन यांची ओळख विश्वस्त श्री. गौरांग कीर्तिकर यांनी करून दिली तर संपादक या नात्याने मी माझ्या गेल्या संपादकीयात राहून गेलेल्या काही नावांचा भाषणात समावेश करणे अटळच होते. डॉ. विनोद धुरंधर, श्याम जयकर, डॉ. प्रफुल्ल विजयकर, माधव प्रभाकर, श्रीकर राणे, शिवशंकर तळपदे, सुरेश तळपदे, रवीन्द्र मानकर, मधुकर तळपदे, सुभाष राव, प्रदीप कोठारे, दीपक धैर्यवान, विनोद आणि प्रतिमा प्रधान आदींचा मी कृतज्ञतेने जाहीर उच्चार केला. कारण 'यांनी घडवला प्रभुतरुण'. या घडविण्यात मुद्रक रमेश भोगटे आणि 'रामकृष्ण प्रिंटींग प्रेस'चा हातभार होता. पुढे भोगटेंचे सुपुत्र श्री. प्रमोद यांचा 'स्नेहेश प्रिंटर्स' सुरू झाला १९७७ मध्ये आणि प्रभुतरुणाची मंतरलेली अक्षरे तिथे उमटू लागली. आमचे विश्वस्त श्री. दीपक कोठारे आणि श्री. गुंजारव कोठारे, संपादक सौ. संजना आणि सौ. मधुरा यांनी आदल्या दिवशी भोगटेंच्या घरी जाऊन त्यांचा सत्कार केला होता. नदीने महासागराचे रूप धारण करताना गंगोत्री न विसरणे हे खासच. विश्वस्त श्री. बन्सी धुरंधर यांनी या शुभारंभी कार्यक्रमाचे स्वागत केले. सौ. भक्ती प्रधान-शेट्ये हिच्या सूत्रसंचालनाने रंगलेल्या सर्वच कार्यक्रमाचे एकाचवेळी ऑनलाईन सादरीकरणही होत होते. हे अनोखेच. पहिल्यांदाच कदाचित्. त्यासाठी अमेरिकेतून मोनिका राणे - अय्यर, श्री. सुनील पवार आणि ज्ञानदा, कार्यक्रमस्थळावरून अरमान, आधार, विहान, निष्का, कॅप्टन अश्विन प्रधान, सागर देवरुखकर, मिहीका आदींची फळीच कार्यरत होती. श्रीनलने अवघ्या एका दिवसात 'प्रभुतरुण अभिप्राय फलक' देखणा करून दिला होता. त्यावर आलेल्या प्रत्येकाने आपले मत, आपला अभिप्राय, आपल्या सदीच्छा नोंदवल्या. हा फलक कायमच

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## TAKE A CHANCE ON ME

**- Mayura Nayak**

I often joke about a fun instance when a friend playfully attempted to read my fate reading the dark and faint lines of my palm. My fortune teller friend said that I have luck standing tall besides me and I will always see lush green pastures around.Sometimes we walk in and out of triumphs and tribulations in pin drop silence that most people around us believe that life is a cake walk for some of us. The fortune teller friend may have just made a smart guess, or maybe he was right in his predictions!

It's a question of debate if the meagre palm lines mean anything or its our wisdom, hard work and sheer determination that drives our fate. I am a strong believer in destiny, but I do feel that we have controlsin our hand that are time bound. Destiny allows us to play our life game with those controls for a while, you can jump many levels in the game of life while the controls last in your hand, but at some point, destiny will play it's trump card and take over your game. Your self-made score till then will pretty much determine you as a winner or not! Life seems like a film made with a beautiful concoction of a perfectly written script efficiently enacted by us. Perhaps the end is noted, but how you play your role, has a lot to define your life….at the end of the journey, when we look back, the film should look like a blockbuster to us!!

The past year has been a rather defining year in my life! At the age of 42 with a career spanning 18+ years, this far, leading teams as a sales professional which many believe to be a male dominated profession, prancing through multiple organisations racing towards a great career in spite of periodic breaks to raise my two kids, everything was going well and I believed that I had made a life for myself. Two doting kids, who adore their mom, a supportive family and a flourishing career, a lot of my friends thought that they would lose a fortune in a jiffy to live my life!

When life seems perfect, I chose to spin the wheel and take a chance!In The last few years, I always did have random thoughts that I should try building something of my own. Those were mere thoughts, nor did I make any conscious move, or think of any eureka idea! Years kept adding, I kept working, from a region head to a national head, the jumps seemed rather worth my while and further pushed the thought of being an entrepreneur away. And when life was on auto mode, 5 years back destiny introduced me to a special person, when I joined a new organisation.

She, a task master, razor sharp tongue that can slit you open, memory of an elephant that she won't forget a number you commit nor will she let you forget that number as she screams across the corridor to make her presence felt. A terror for many who may have cried walking out of reviews she would conduct. A strong lady, my boss, who the entire floor was scared of, but hired me just after a simple phone call. I distinctly remember her telling me, "I have heard of you, so I don't need to meet you, but JUST GET THE WORK DONE, I don't have time on hand" We built two businesses together in that organisation creating beautiful teams and memories of a lifetime! A team that travelled extensively and became an extended family.

When everything seems great, and you are in a cruise control mode, you feel the urge to shift gears! We were such a great team, that we felt if we could start two successful businesses for our organisation, we could create magic if we put our forces together to build something we are truly passionate about. The decision took 3 months, but one of the toughest and boldest decision for us was to leave our well-paying jobs to start from scratch. My boss and

(Cont. on page 2 col 1)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

रहाणार आहे. तसेच आलेल्या श्रोत्यांच्या कायम स्मरणात राहील असा रंगलेला कार्यक्रम म्हणजे ‘प्रभुतरुण कट्टा-थोडी मस्ती थोडी थट्टा’, आपल्या ज्ञातीत आलेल्या सुनांचा आणि ज्ञातीबाहेरील जावयांचा सौ. शिवानी देवरुखकर आणि श्री.बन्सी धुरंधर यांनी रंगवलेला हा खास खेळ होता. यात सहभागी होते - पूजा नवलकर, आनंद मेनन, दीपाली प्रधान, डॉ. संदीप सत्तुर, अनुजा अजिंक्य, डॉ. रौनक कुलकर्णी, स्मिता गोरक्षकर, संजय परब आणि स्मिता जयकर. स्मिता जयकरांना दुसऱ्या सभेसाठी जायचे असल्याने त्या या खेळातून जरा लवकर गेल्या इतकेच. या खेळाबद्दल शिवानी स्वतंत्रपणे लिहीणार आहे. इथे फक्त इतकेच सांगते की मंचावरील मान्यवर आणि श्रोते यांच्यामधील सीमारेषाच पुसली गेली होती. काही थट्टेखोर प्रश्न, काही गंमतशीर भाष्य, काही सामान्य ज्ञानाची चुणूक, काही गीत सादरीकरण आणि काही आठवणी... असा हा कार्यक्रम श्रोत्यांच्या नक्कीच आठवणीत राहील. माझ्या हस्ते केक कापणे, मिहीकाने केलेले देणग्यांचे वाचन, गुंजावरचे आभार प्रदर्शन हे सगळे ओघाओघाने झालेच. पण आठवणीत राहील अशी फार छाऽऽन गोष्ट म्हणजे सुरूवात आणि शेवट छोटुकल्या आरा प्रतिक अजिंक्य हिच्या गाण्यांनी झाला. युवाच नव्हे; तर पुढली पिढी छोट्यांचीही; प्रभुतरुणाशी जोडली गेली. मी माझ्या भाषणात माझी एक कविता सादर केली. ती इथे जागे अभावी नाहीच देता येणार. (पुन्हा कधीतरी!) पण त्याचे ध्रुपद मात्र या संपूर्ण कार्यक्रमाचा अनुभवच होता म्हणायचे. त्या ओळी अशा -

प्रभुमनांचा राजा हाचि प्रभुतरुण महा।।

# ``WORDPLAY"

**-Armaan Kothare**

**The Missing Wallet**

Mr. Winston was in a hurry that afternoon, for his well-earned vacation was just around the corner...err, hours of driving away. For this trip, he had prepared and dreamed of for days...and was excited to do absolutely nothing. "That's what a vacation is!", he used to say.

That afternoon, he had gone along with his son, Harry, to the hair cut salon across the street. His wife had specifically told him to go with a quick cut and get home fast, as the journey to the villa was a long road trip. Nonetheless, Mr. Winston couldn't say no to the relaxing head massage.

In about an hour, Mr. Winston was done,

so was his son, and he pulled out his phone to see five missed calls and seven angry messages from his wife. He trembled and proceeded to scan the payment code of the salon.

But, to his surprise, it said that the account he was paying to was invalid. A little afraid, and a little confused, he showed the message to the receptionist. She too, was confused, and afraid. He tried a few more times, just to see the message pop up again.

Then, he decided to change the app and try once more.

Still, the same message was being displayed. Curious, confused and afraid, he took out his wallet and asked her whether she accepted card or cash payments. She nodded, and took the wallet from his hands. Soon, the payment was complete, and he left with his son to go home.

On reaching home, his wife hammered him with all sorts of complaints, mostly leading to "reaching late". Harry backed his father as a witness, but that backfired too.

"I told you repeatedly, come home by 4...but NO! You decide to return by 5:30 with your head held high! And god knows what you're imprinting on our young son! Sweetie, why did you come so late! Was daddy talking with that stupid receptionist?!"

"No mummy-"

"Aah...look at this! You've told him to deny everything! Oh you rascal! I know exactly how you look at that woman! *Will you except my card?? Oh yes, I most definitely will...* "

"But honey, that's-"

"Lies!! All lies! Don't you "honey" me!"

"Mummy....daddy just had a head massage, hair cut and some payment errors..."

"Head massage!! You seem to have so much time eh! Ignoring all my calls, and going in for a massage!"

This went on for a while, and after the dust settled, Mrs. Winston ordered her husband to go for a bath.

After all was done, Mr. Winston got dressed, packed his bag and found his chance to fight back against his wife.

"Charlotte!! Where is my wallet!! I've told you a million times to keep it with my belt so that I don't forget it!!"

Charlotte replied in the same angry tone, "It wasn't in your pocket when you came back!! You must have put it on the basin in the bathroom!"

After re-checking the basin, all hell broke loose. Harry was ordered to look in the hall, Mr. Winston in the bed room and Charlotte "looked" in the kitchen. After twenty minutes, nothing much had changed. At this point, Charlotte was angrier, and Winston was really afraid. Then, Mr. Winston decided to trace back their steps to the salon to see whether the wallet had fallen anywhere or had been left on the counter. Harry decided to tag along too.

On reaching the front of the salon, Harry pointed out two CCTV cameras that were built in a way that they covered the entire area in question. Harry went to the security office to see the footage, and Mr. Winston went to the salon.

The security were very reluctant and said that the footage could only be accessed by the police through the chairman who lived across the street. Harry tried to explain the situation to them, but they didn't budge.

The salon didn't help the situation either. The receptionist said that she remembered returning him the wallet. She also said that they had an honest business, and she had kept wallets and cards of people who forgot them to this day.

Hearing this, Mr. Winston was somewhat relieved but also afraid, as he did have at least two thousand bucks in the wallet.

As Mr. Winston was about to check the salon's footage, Harry came through the doors holding up a wallet and asked, "Is this yours' dad?"

Winston replied yes, and asked Harry where he found it. Harry said, "The security weren't helpful, so I hung my head and went back to the car. I decided to check the bags in the back to see whether it got in there by mistake when we were packing, and there it was. You're welcome."

Mr. Winston was speechless and also afraid of what his wife would say. But, he thought of a fix for that too.

"We found it on the counter, Harry."

"On the counter, dad, on the counter."

---

विस्तारित संपादकीय


(पान १ कॉलम ४ वरून)

one more of our team members and I resigned together, which turned out to be our organisations most talked about resignations of the year! This did solicit a lot of free advice from colleagues and seniors who felt we were writing our dooms day with our own hands. Each one is entitled to an opinion, but the 3 of us unanimously stood our ground telling each other that we have to do this to live what we dreamt of together.

Today we are around 5 months into our business. Our passion project, our company that we have named Huella Services is live. "Huella" in Spanish means a footprint. We are set on a journey to carve our footprint in our industry. Too early to say if what we did last year was the right decision, but our hearts are filled with gratitude with every big and small success we see. They say an entrepreneurial journey truly unfolds your real friends, and well-wishers!! We do have our challenges and low moments, but we quickly cheer up to celebrate our every small and big triumph. We have handpicked a team that is the foundation of our dream project. We want to live our dream and also fulfil dreams of our teams who have entrusted their faith in our vision. Somewhere, perhaps destiny planned that phone call with my boss that landed the job in my lap so effortlessly spiralling into what we have created today!

Two years back, I could detach myself from my job each day at 7pm to come back home to spend time with family. Today, my work is a dinner table conversation, that not just my husband but also my sons are picking up. Some years back when I took a break from my job to look after my kids, I had no idea if I could ever come back into a full time job! I was destined to wriggle my way into a professional set up, but I did have to work extremely hard, shoulder to shoulder with my counterparts to get there! Had I continued my job perhaps I would have continued a cushy and cozy life, but would have stagnated on my learning curve! It is possible that this decision I took completely goes south, but when the Plan B is to make Plan A work, the choices are limited and we put our best self forward. So, while fate continues to show me greener pastures, my pursuit to give my best to this labour of love will continue. As I embark on this new journey, I look back at the journey so far and truly believe that life is a cocktail of fate and efforts almost in equal amounts.

My reason to share my experience with you all is to perhaps shake someone amongst you to follow a calling of a dream that is nudging deep down inside your heart. Sometimes life unfolds opportunities to those who give themselves that chance! A risk taken and gone wrong may still be better than a risk not taken at all! Often we blame others for the conditions we have brought ourselves into! If we believe that we have the controls of our life in our hands till destiny plays its trump, we will play our cards with full honesty and responsibility to make it work while it lasts. And finally, I would like to make a special mention of what my nephew Armaan Kothare wrote in the last month’s issue. He said that life needs a little bad to appreciate the good! A rather profound thought coming from a 16 year old, but that pretty much sets a precedence to my thinking that there are failures so you can relish the success, there are hardships so that the comforts seem sweet, the bitter sweet mix of fate, risk and effort is inevitable. Eventually if you have no one else but yourself to lean on, you will give yourself that chance to fly! SO turn around and tell yourself **"TAKE A CHANCE ON ME"**



सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सन्मान पत्र

श्री. नारायण आनंदराव अजिंक्य यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.

COLLECTOR OF BOMBAY

मंत्रालय, मुंबई
दिनांक [illegible]
No. AB/MAG/26/SAN-115
Office of the Collector of Bombay,
Old Custom House, Fort,
Bombay,
For Collector of Bombay

मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

### घरोघरी तिरंगा

तिरंगा म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे प्रतिक आहे. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात लाखो अनामिक लोक निस्वार्थीपणे परिणामांची पर्वा न करता ब्रिटीशसत्तेविरुद्ध लढले. ह्या लढ्यात त्यांनी हसत हसत देशाकरिता तुरूंगवास भोगला. स्वातंत्र्यलढ्यातील एक स्वातंत्र्यसैनिक आमचे बाबा- 'नारायण आनंदराव अजिंक्य'.

ते मॅट्रीकला असताना महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू यांची भाषणे ऐकून देशकार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळाले. त्यावेळी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन देशासाठी काहीतरी करावे येवढेच माहीत होते. त्यामुळे देशभक्तीपर गाणी म्हणत प्रभात फेरीमध्ये सहभागी होऊन वेळोवेळी खादीचा प्रचार करायला त्यांनी सुरूवात केली .

'सविनय कायदे भंग' म्हणून ओळखले जाणारे जनआंदोलन १९३० साली सुरू झाले. मीठाचे कायदे, जंगल कायदे यासारखे अन्याय कायदे तोडण्याचा या आंदोलनाचा हेतू होता. गांधीजींनी कायदेभंगासाठी भारतीयांना आवाहन केले . त्यावेळी आमचे बाबा मॅट्रिकला होते. त्यांनी शाळा सोडून ते इंग्रजांच्या जुलमी कारभाराच्या विरोधात आंदोलनात उतरले आणि त्यांनी नाशिक 'जंगल सत्याग्रहात' भाग घेतला. तेव्हा इंग्रज शिपायांनी कठोरपणे लाठीमार करून सर्व आंदोलकांना झोडपून काढले व पकडले. आमच्या बाबांना 'ब' वर्गाचे राजकीय कैदी म्हणून ४ महिने कारावासाची शिक्षा झाली . त्यावेळी ते फक्त १९ वर्षांचे होते. त्यांना आधी अहमदनगर, मग पुणे, नंतर नाशिक येथील तुरूंगात ठेवले होते. तुरुंगात असतानासुद्धा कैद्यांना क्षुल्लक कारणांवरून बेदम मारहाण करण्यात येत असे. तुरुंगातून सुटका झाल्यावरसुद्धा, जे लोक तुरुंगातून सुटले नव्हते; त्यांच्या कुटुंबाला ते हस्ते - परहस्ते मदत करीत राहिले. कारावासातून सुटका झाल्यावर बाबांनी मॅट्रिकची परीक्षा दिली व सिद्धार्थ महाविद्यालयात वाणिज्य शाखेत प्रवेश घेऊन 'अकाऊंटन्सी'चे कोर्सेस पूर्ण केले. आमच्या बाबांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ महाराष्ट्र शासनातर्फे निवृत्ती वेतन व सन्मान पत्र देण्यात आले होते .

**-विश्वास नारायण अजिंक्य**

*

**थोडं बोलू या**

# कोंडमारा...

**-श्रेया तळपदे**

सकाळी १० वाजता फोन वाजला. सकाळी कामाच्या गडबडीत फोन आला ना की जरा चिडचिडच होते. आता कोणाचा फोन? त्यात काम वेळेवर आटपण्याची घाई. फोनवर बोलत बसले तर कामं राहातील. स्क्रीनवर पाहिले. आईचा फोन. लगेच उचलला. तिथून आई बोलत होती; पण इथे माझ्या डोळ्यासमोर हातातली काम नाचत होती. तिला नंतर फोन करते असे सांगेन म्हटलं तर तिच्या बोलण्यातला उत्साह बघून तेही सांगता येईना.

शेवटी हातातली कामं बाजूला ठेवली आणि तिच्या बोलण्याकडे लक्ष दिलं. तर काय आमच्या आईसाहेब सकाळी सकाळी आमच्या नात्यातील एक काकी आहेत त्यांच्या विषयाला घेऊन त्रस्त होत्या. कशाप्रकारे त्या काकी एका बाजूला सून आणि एका बाजूला त्यांचे दीर-जावा, घरातील इतर मंडळी यांच्या कात्रीत सापडल्यात; सगळ्यांचा समन्वय साधणं कठीण झालंय आणि इतके वर्ष एकत्र बांधून ठेवलेल्या कुटुंबाला विखुरलेलं बघता येत नाहीये. यात त्यांचा कोंडमारा होतोय... 'कोंडमारा'.

खरं तर हा असा किंवा यापेक्षाही वेगवेगळ्या विषयांनी वेगवेगळ्या स्तरांवर आयुष्याच्या अनेक वळणांवर कोंडमारा होत असतो. आपल्याला जे बोलायचंय ते दडपलं जाऊन दुसरंच बोललं जातं. स्वत:चाच स्वत:शी, मनाशी, विचारांशी चाललेला संघर्ष असतो कोंडमारा. स्वत:च्या स्पष्ट मतांना, विचारांना कसल्यातरी भीतीपोटी, तर कधी समोरच्याचा विचार करून त्याला काय वाटेल, कोणाचं मन दुखावू नये या विचारापोटी आपलं म्हणणं मनातच कोंडून ठेवणं; अशाने व्यक्तीची आतल्या आत घूसमट नाही का होत? कोणीतरी मन घट्ट, नाक-तोंड बंद करून मनाला मिळणारा ऑक्सिजन रोखून धरलाय, मनाने श्वास घेणं बंद केल्यागत वाटायला लागतं आणि बऱ्याचदा हा ऑक्सिजन बंद करणारे आपण स्वत:च असतो.

नाही. नाही तुला काय जात लांबून बोलायला? ज्याला परिस्थितीला सामोरे जावे लागते त्यालाच कळते. उगाच मनातलं बोलून परिस्थिती चिघळली तर... उगाच आपल्या स्पष्ट मतप्रदर्शनाने वाद झाले तर? उगाच नाती तुटली तर, उगाच आपल्या मतांना चुकीचं ठरवून खोडून काढलं तर? नको-नको; नकोच ते. वातावरण गढूळ होईल असे आपणच आपल्या मनाशी बोलून त्याला गप्प राहायला भाग पाडतो. अहो, पण अशाने आपणच आपल्या मनाचा ऑक्सिजन सप्लाय बंद करतोय आणि तेही जर... तरला घेऊन. असा सतत कोंडमारा मन ही किती काळ सहन करेल? एक दिवस मन मरून जाईल की बिचारे... निदान मनात जन्माला आलेल्या विचारांना बाहेरच्या जगात येऊ तर द्या; तेव्हाच कळेल ना की ते विचार योग्य की अयोग्य, चांगले, वाईट. मग होऊ देत की जरा वाद विवाद. मंथनाशिवाय अमृत हाती लागणार तरी कसं? मनात कोंडून पडलेल्या वाईट विचारांना बाहेर येऊ न दिलं तर निदान ते वाईट आहेत त्याची पुनरावृत्ती करायची नाही हे तरी मनाला कळेल.

समज-गैरसमजही मनातून बाहेर पडले नाहीत तर मनात राहून सडत जातील आणि त्या सडलेल्या दुर्गंधीला मिटवणं जास्त कठीण होईल. बऱ्याचदा समोरच्या व्यक्तीबद्दल मनात संशय-गैरसमज स्पष्टपणे मांडले तर ती व्यक्ती आपल्याबद्दल काय विचार करेल? आपल्याला काय समजेल? पण मला वाटतं ह्या विचारात अडकण्यापेक्षा आपल्याला जे वाटतंय ते बोलून मोकळं व्हावं, निदान त्याने आपल्यातले गैरसमज मिटतील, संशय दूर होतील. हो, पण यातही हा प्रश्न उद्भवतोच की स्पष्ट वक्तेपणाला किती सकारात्मक दिशा मिळतेय. शेवटी मी पण आलेच या प्रश्नांच्या कोंडमाऱ्यात.

खरं तर जन्माआधीपासूनच नऊ महिने कोंडमारा असतोच. चारही बाजूला काळोख. बोलायचंय ते दडपलं जाऊन दुसरंच बोललं जातं. अन्न, पाणी, वारा आपल्या हातात कुठे असतं नऊ महिने?

जन्माला आल्यावर वेगळेच कोंडमारे, वेगळाच काळोख, वेगळीच दडपणे. इथेही बऱ्याचदा अन्न, पाणी, निवारा तेही दुसऱ्याच्याच हातात.

हा कोंडमारा संपवायला अजून कुठे जाऊन जन्मायचंय?

नवलCURRY

# शास्त्र असतं ते...

**सौ. मुकुला प्रदीप नवलकर**

गोड पदार्थात कणभर मीठ आणि तिखट पदार्थात चिमूट साखर, जसा रागात थोडा लोभ आणि लोभात नाकावरचा राग !

पंचपक्वान्नांनी सजलेले नैवेद्याचे पान तुळशीपत्राविना अपूर्ण असते. औक्षणाच्या ताटात, दीपलक्ष्मीचा मान ठेवत ओवाळणी म्हणून, फुल ना फुलाची पाकळी घालायची असते. करंजी करताना एक लाडू करायचा असतो. बाप्पाच्या उकडीच्या मोदकासह नेहमीच, उंदीरमामांसाठी कावड केली जाते. तिळाचे लाडू वळताना चूलबोळकं, अडगुलं मडगुलं, पोळपाटं लाटणंही बनतं.

साध्या सोप्या रितीभातीतून हे सारे संकेत जीवनावरील सुटसुटीत सूत्र मांडतात.

कुटुंबवत्सल सश्रद्ध भावभावना, नातीगोती यांच्यात गुंफलेले धागे अधिक घट्ट करतात. नियमबद्धता म्हणजे बंदिवास नव्हे; तर सातत्याने केलेले प्रयत्न, घेतलेले कष्ट, दिलेला वेळ, हे सारे सत्कारणी लागून संपन्न होणारी, फलप्रद साधना आहे.

शास्त्रकारांनी माणसाच्या हिताचे नियम सांगून ठेवले आहेत आणि तेव्हाच त्या नियमांना स्वाभाविक कारणांसाठी, अपवादही सांगितले आहेत.

कलीयुगात, याच अपवादांना नियम समजून आचरणात आणले जात आहे. आजच्या चढाओढीच्या युगात, या रिवाजांचे गर्भित गांभीर्य हरवले आहे आणि ते शोधू म्हटलं तरी वेळ नाही, ताकद नाही, जमत नाही या सबबींनी एकतर आपण रितीभाती वाकवून वळविल्या आहेत नाहीतर सरळ सरळ मोडीत काढल्या आहेत.

आज उत्सवात मूळ विचारबद्ध हेतू आक्रसून गेला आहे आणि मनोरंजनाच्या नावाने आक्रस्ताळेपणा मात्र बोकाळला आहे. चलता है, ही आजच्या काळाची वृत्ती झाली आहे आणि परिणामांती समाजात, सार्वजनिक उत्सवांच्या निमित्ताने गैरप्रकार बोकाळतात तेव्हा समाजाच्या प्रतिमेसह समाजमन अध:पतनाचा मार्ग चालू लागते, असे दिसून येते.

वर्षांतील उन्हाळा, पावसाळा, हिवाळा यानुसार, तेव्हाच उगवणाऱ्या रानभाज्या, पीकं, अन्नधान्यं, फळफळावळं यासकट शरीरशास्त्रानुसार, पचनसंस्थेची जरुर काळजी, यांचा विचार करून, सणावारांची आखणी केली आहे.

त्याचबरोबर प्राणीजगतातील प्रजननकाळ आणि वर्षभरातील आपली चवीढवीची पोटपूजा लक्षात घेऊन, तसेच कालमान, ऋतूमान, मानवी मन आणि शरीर यांचा परस्परसंबंध ध्यानात घेऊनच सर्व रुढी आणि परंपरा घालून दिलेल्या आहेत. परंतु आपल्या एककल्ली विज्ञाननिष्ठ बुद्धीला मात्र याचा विसर पडला आहे आणि लोकसंस्कृतीची मूळ वैभवशाली परंपरा लयाला गेली आहे.

जुने दिवस आठवले की आठवतात, सणउत्सवांनी गजबजलेले महिने. आपले रितीरिवाज, नेमनियम. व्रतंवैकल्य यांना पावित्र्याचे प्रतिष्ठान तर आहेच; तसेच ते साजरे करताना, जनमानस आणि स्थानविशेष यांचाही यथोचित विचार केला गेला आहे.

चैत्राच्या पाडव्याला गुढी उभारून, कडुनिंबाच्या पानांसह गुळाचे सेवन.

साडेतीनपैकी वैशाख तृतियेच्या अक्षय मुहूर्तावर खरेदी. जेष्ठातील पुनवेचे वृक्षपूजन.

आषाढात चरम वर्षाकाळी जीवीचा विसावा असा पंढरीचा सखा, त्याच्या भेटीची आस पुरविणारी दिंडीवारी.

श्रावणाचे, सुतोवाच करीत आहारासाठी लक्ष्मणरेषा आखून देणारी अशी गताहारी आषाढ अमावास्या, जी दीपपूजन आणि ज्योतीची आराधना करणारी, तिमिरातून तेजाकडे नेणारी अशी जनार्दनाची साधना आहे. ती आज मात्र, पूर्णत: विपर्यस्तपणे माणसाच्या विवेकाचे अधोगमन पराकाष्ठाच दर्शविते, असे खेदाने म्हणावे लागेल.

त्यानंतर त्यापुढील चातुर्मासातील परिपूर्ण निसर्गसौंदर्य अनुभवत विशेषेकरून घर, कुटुंब, आप्तेष्ट यांच्या सहभागाने, चतुर्थी, पंचमी, अष्टमी पौर्णिमा असे चढत्या क्रमाने पार पडणारे, सणवार उत्सव, आपल्या लोकसंस्कृतीचे विलोभनीय दर्शन घडवितात. त्याकाळी प्रत्येक मनाला आलेली उभारी आणि जनमानसातील ओसंडून वाहणारा उत्साह, सारे काही आठवते.

श्रावणी सोमवारी केळीच्या आणि शनिवारी दिंडीच्या पानांवरची जेवणं, सोवळ्यातील स्वयंपाक आणि गोरजमूहूर्तावर बसणारी सोवळ्यातलीच पंगत. घराघरातून दरवळणारा स्वादिष्ट पदार्थांचा सौम्य सात्विक गंध.

श्रावणी शनिवारची तेलपाणी उतरवण्याची प्रथा, सोमवारी धान्याची शिवामूठ वहाणे, मंगळागौरीचा जागर आणि तनमन घुसळून तरतरी आणणारे माजघरातले खेळ,

शुक्रवारी जीवती पूजन, पंच नागवंशाची स्मृती सादर जागविणारी पंचीम, कान्हा आणि त्याच्या सवंगड्यांची दही दूधाची निरागस लयलूट. उधाणलेल्या सागराचे अधीपती, मित्र आणि वरुण यांना श्रीफळ वाहून शांतविण्याचे आर्जव, सारं आठवतं.

तसं आम्ही श्रावण पाळतो, असे म्हणत सोयीस्कर मार्गाने श्रावणन्टाईन होणारी पिढीही आता उतरणीला लागली आहे.

श्रावणातील दर्शअमावस्येला, घरात चौसष्ट योगिनींचे आणि गोठ्यात कृषीवलांचे सहकारी नंदीराजांचे कृतज्ञतेने पूजन म्हणजे मातृत्वाची महती आणि सहयोगाचा सत्कार. भाद्रपद शुक्लपक्षात विघ्नहर्त्याचे लाडकोड आणि त्याला सोबत म्हणून आलेल्या माहेरवाशीणीचेही कोडकौतुक, तिला गोडाधोडाचे पदार्थ तर काही ठिकाणी सामिष पदार्थांचाही नैवेद्य.

कृष्णपक्षात वाडवडील, पूर्वज, पितरांचे श्राद्ध, पिंडदान.

अश्विन नवरात्रींचे नवविधा शक्तीरुपांचे जागरण. विजया-दशमीला शेणाचे पांडव पूजन आणि सोनपानांची देवाणघेवाण.

वही, पुस्तके आणि पाटीवरील विद्येश्वरी शारदेचे पूजन. निरभ्र आकाशाखाली जागवलेली कोजागिरीची रात्र. आटीव मसालादूधाचे पेले आणि नाना प्रकारची चविष्ट भजी यांवर मारलेला ताव, सारं आठवते.

दिवाळीचे पहाटेच्या गारव्यात तेल उटणं लावून केलेलं अभ्यंगस्नान. त्यानंतर सर्व कुटुंबियांनी एकत्रित बसून घेतलेला, घरगुती फराळाचा समाचारही चांगलाच स्मरणात आहे.

कार्तिकात तुळशी विवाहाचा थाट, त्यानंतर देव दीपवाळी. पुढे भोगी संक्रांतीचे, गोडीगुलाबीने तिळगुळाचे आदानप्रदान. तेलपोळ्यांच्या सोबतीने रंगलेली घडापार्टी.

रथसप्तमीपर्यंतचे हळदीकुंकवाचे रंगबिरंगी समारंभ अन् फाल्गुनी पौर्णिमेला, होलिकोत्सवाने त्या संवत्सरातील सण उत्सवांची, तेवढ्यापूरती मंगल सांगता.

सारं चलत्चित्र झर्झर् डोळ्यासमोर उलगडते.

घराघरातील बालपण समृद्ध करणारे, हे सणवार..! यांबरोबरच, समाजातील इतर भाषिक, प्रदेश, प्रांतीय सहप्रवासी आणि त्यांचे उत्सव, नववर्ष स्वागत याशिवाय गुरुजन, समाजातील आदरणीय महानुभाव,

मातृभूमी,तिचे सुपुत्र यांचे पुण्यस्मरण.

स्वतंत्रता आणि गणतंत्र दिवस हे राष्ट्रीय सण, यानिमित्त आयोजित विविध उपक्रम हेसुद्धा आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील मार्गदर्शक उत्सवच आहेत, जे प्रसंगोपात अशाच कालसापेक्ष पद्धतीने साजरे केले जातात.

आजही या सगळ्या रुढी परंपरांचा वारसा, कौटुंबिक स्तरावर, पिढीजात वैभव म्हणून सांभाळणारी घरंदाज कुटुंब आहेत.

आजही बदलत्या काळाची बदलती परिमाणं आणि जीवनशैली यांचा सकारात्मक समावेश करून मध्यम मार्ग जोखला जातो आहे.

हे सारं पूर्वसंचित व्यक्तिश: जपताना त्या मागच्या शास्त्रीय प्रेरणा, पायाभूत विचार प्रणाली आणि उत्साही सहभाग ही त्रिवेणी मात्र, सार्वत्रिक स्तरावर आता फक्त आठवणीत उरली आहे. काळ पुढे पळतो आहे आणि मानवसमाज आपल्यापरिने, त्याच्यासोबत जुळवून घेतो आहे,असेच म्हणावे लागेल.

याचप्रमाणे जागृत कर्तव्यबुद्धीने, समाजात वावरताना आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म म्हणजे, सर्व देयकर नियमित भरणारे. इतरांसोबत असताना, स्वयंप्रेरणेने रांगेची शिस्त पाळणारे, सिग्नल लाल झाला की फर्लांगभर आधी थांबणारे, सिग्नल हिरवा झाल्यावरच झेब्रा क्रॉसिंग करणारे, सार्वजनिकरित्या साजरे होणारे देवीदेवतांचे उत्सव, सत्यनारायणाची महापूजा यांना स्वत:हून हातभार लावणारे.

सामाजिक कार्यक्रमात वेळेआधीच पोहचून, खुर्च्या लावणारे आणि प्रमुख पाहुणे चहापानाला गेल्यावर जाजम, सतरंज्या आवरणारे, ह्यांची जमातही आता दुर्मीळ होते आहे. हे सारे स्वयंस्फूर्त नीतीबध्द साहचर्य, नियमात बसवून कायद्याच्या चौकटीत, बंदिस्त नाही करता येत. त्यासाठी आतून तळमळ असावी लागते. मीच का? ह्या प्रश्नाचे उत्तर अजून सापडायचे आहे आणि सापडलेच तरी ते पटेल असेही नाही.

आजच्या काळ, काम, वेगात हे असे वागणे, थोडे दुरापास्त झाले आहे तरी मानवसमूह म्हणताना, जे साऱ्यांनाच एकत्र राखेल, असे आंतरसूत्र आवश्यक आहे. स्वयंशिस्तीचे पालन हे सर्वकालीन आदर्शभूतच आहे. त्यामुळे वेळ, शक्ती, संसाधने यांची बचत तर होतेच शिवाय गाठीशी मनभरुन समाधान ही मिळतेच.

आपले जगणे ही जगन्नाथाची रथयात्रा आहे. या उत्सवात,आपल्या कुवतीनुसार आरंभापासून सांगतेपर्यंत, कधी आणि कसा हातभार लावावा, हे आपल्यालाच ठरवायचे आहे.

आज सर्व क्षेत्रातील सर्व कामे मोलावर देता येतही असतील, तरी रसरसून आणि समरसून केलेल्या कामातील जिवंतपणा कधी विकत मिळत नाही.

समुहाच्या मानसशास्त्रात, निरपेक्ष भावना आणि संतुलित विचार यांचा वावर नेहमीच सफल होतो. अशा समयी, मनामनांत जपलेली संस्कृती आणि मानवतेचे संस्कार, ज्यात माणूस माणसाशी जोडलेला रहातो,

यापेक्षा अधिक योग्य ते काय ?

म्हणूनच आजच्या प्रगत काळातही, जगाच्या कानाकोपऱ्यात, जात, धर्म, पंथ भाषा, देश, प्रांत वा प्रादेशिकता यांच्या सीमारेषा पुसून, अखिल मानवतेची ही उत्सवप्रियता, हा आनंददायी, सुखसमाधान आणि शांती..तृप्तीदायी उत्सवधर्म, असोशीने जपला गेला पाहिजे. कारण प्रसंगोचित उत्स्फूर्त सहयोगाने आणि उत्साहवर्धक सहभागाने, परंपरागत उत्सव अन् प्रसंग साजरा करणे, हेही एक शास्त्रंच असतं...!

*

# TRAVELOGUE

-Aadhar Kothare

## Bombay eateries - Part 1

If you are exploring the city and want to get some delicacies that literally shout Mumbai to you, you must not miss out on these iconic eateries in Mumbai. When one says Mumbai, the first thing that comes to mind is sea and the creatures in the sea such as different type of fishes, prawns, crabs, lobsters that later become part of some delicacies. But Mumbai is more than that, Mumbai is a mix of different cultures, where many cuisines have come together, some newly created in Mumbai, some which have travelled from miles away, but got changed and mixed with the local flavours. So today we are going to talk about some vegetarian eateries around, without which Mumbai is incomplete.

Whenever the various eateries of Mumbai will be talked about, the Chat& Bhelpuristalls at every nook and corner of the bylanes of Mumbai will always be talked first. I don't think the people of Mumbai will ever trade the Sev-Puri's, Pani-Puri's with any other dishes across the world. And though there are many delicious chats that you will find across Mumbai today we would want to talk about one such place in the Girgaon area of Charni Road, near Hinduja college famously known as the Sharma Bhelpuri House Tarabaugg. He has been serving different types of chats in this small outlet for many years now. Though all his chat items are delicious, his Pani-Puri has been the flavoursomeof them all, though a bit on the spicier side. And over all these years, the taste of his chats hasn't changed even the slightest.

Another street food that is synonyms with Mumbai is the Batata vada/Vada pav. Termed as a cost effective but wholesome snack for many poor persons, labourers and even office goers, batata vada or vada pav has always been the first go-to and quick snack that every Mumbaikar will vouch for. It is actually nothing but a plain potato bhaji with some spices stuffed inside the besan coating and deep fried filled with mix chutneys inside a pav, but it helps people fill their stomach in times of hunger. The outstanding thing about this snack is that it tastes just the same whether it's hot and crispy in the scorching heat of Mumbai or cold and soggy in the damp Mumbai rainy season. Started from every nooks and corners of Mumbai, it has gone ahead to become a commercial success with Jumbo King vada pav outlets outside every railway station of Mumbai. Two such places that we would like to highlight today are the Ashok Vada Pav outside Kirti college in Dadar West area and Shree Krishna Batata Vada outside Dadar station. Ashok Vada Pav is one of the legendary place were the Vadapav was invented. They serve Vada-pav & Chura-pav with tikha-mitha chutney, which gives it a unique & delish taste. Shree Krishna has been serving Authentic Maharashtrian Snack items for almost 4 decades. The quality of the ingredients they use is the best part of their food. Though they serve many Maharashtrian snack items such as Kothimbir-vadis, Sabudana-vada and Samosas, they are famous for their Batata vadas, which are well spiced. It's a must get item. Best part about their products is that they are very light, you never feel bloated by their food. They do charge you premium considering Mumbai snacks, but it's for the Finest quality.

Talking about Maharashtrian snacks & breakfast items, there are many places in Mumbai that serve it but some notable places that I would like to highlight today are Aaswad in Dadar West , Mi Marathi in Vile Parle east, VinayLunch Home in Charni Road. Now each of these places serve almost similar variety of Maharashtrian snack dishes such as Misal, Batata vada, Kothimbir-vadi, Sabudana-vada, Poha, Sheera, Piyush, etc., yet each of them are famous for some of their lip-smacking dishes. Vinay lunch home is famous for its Misal that has the perfect spices & consistencywhich is topped with chopped onions, coriander leaves & sev and batata vada and though it's a bit on the spicier side, both are a must-have. Just like Vinay lunch home, Aaswad too is famous for its delicious Misal, kothimbir-vadi, batata-vada, Pithla bhakri and many such Maharashtrian cuisine dishes, but along-with it, also offers many other specialities such as Chaitra Thali exclusively for the month of Chaitra consisting of Kadhi, Batata Suki Bhaji, Kajuchi Usal, Fansachi Bhaji, Aamras, Aambe Daal, Kobi Pachadi, Puri, Paan Bhajji/Pakoda, Masale Bhaat, Papad, Kairi Panhe. One dish that one must try while in Aaswad is their Ukadiche Modak which are delicious and mouth-watering. Even the Mi Marathi outlet serves authentic dishes like Aamras Puri, Misal Pav, Thali Peeth, Puranpoli, kanda bhaji, etc. which are a must try.

Another very peculiar dish that is part of Mumbai's street food is Pav Bhaji. A bhaji made of potato, tomato, capsicum, onion and various other spices cooked slowly with lot of butter and served with butter pav's on road-side carts is what every khao-galli of Mumbai will have. And though there are many such hand-carts and restaurants that serve this dish, there are some outlets that serve the most delicious Pav Bhaji in the city. Sardar Pav Bhaji in Tardeo, Grant Road is rated as one of the best Pav Bhajis in the city. They have customers coming from even the remotest corners of the city to especially eat this Pav Bhaji. They put a slab of Amul Butter on their Pav Bhaji which makes it even more delicious. It is a must-eat place in Mumbai and you can also try their Mango Shake in summers, the combination of these two is heavenly. This is among the few iconic eateries n Mumbai that have not lost its charm. Then there is one more in the bylanes of Vile Parle West known as Maruti Pav Bhaji famous for its delicious Kali Pav Bhaji. It serves piping hot bhaji and buttery pav. Also the masala pav is super tasty. It remains open till late night and one can also take parcel. Must visit place if you are a pav bhaji lover.

Very notable joints in Mumbai that serve hot snacks through-out the day and have carved a niche for themselves is the south Indian cuisine comprising of Idli, Medu-Vada, Dosas, Rasam Vadas, Uthappa's, filter coffee and many more. Though thesetype of cuisine tastes differently in every south Indian state, Mumbai has adapted them in their food-culture and hence one can find these dishes in practically every other restaurant. But there are some specific places in Mumbai that have been serving these south Indian cuisines for many decades now and one must definitely try at these places. One of the top two places that come to my mind are Ram Ashray - one of iconic and authentic South Indian food restaurant in Matunga that opens at 6am and it is usually packed with people. The Udupi specialities like the Rava Mysore Dosa, Neer Dosa and Golibaje are excellent, and so are the other items like the Pudi Idlies, Dosas, and Rasam Vada, Their Pineapple Sheera is a dessert I'd recommend not to miss, and the filter coffee is better than most other places in Mumbai. The other one is off-course, Arya Bhavan - A small yet cozy place with rich South Indian cuisine taste. Along-with the regular south-indian dishes, they also serve Brahmin Idli, Rice Sambhar, Dosa, Uttapas, thatte idli, spring dosa and Rasam mini idli as well.Everything there is pocket friendly and extremely good in taste. When it comes to South Indian cuisine, how can you leave behind Cafe Madras, one of the most iconic places in Mumbai?

This little place has been running for over 80 years in Matunga. This is where people have been eating their breakfast for years, they start their day by going to cafe Madras. The Rasam Vada was introduced to the menu in 1960 and it's still served today – delicious and with a hint of nostalgia. You must try their Dosas, Idli and also their Sheera to end it on a sweet note! They serve delicious South Indian breakfast that is healthy, tasty and also at affordable prices. There is literally a long line outside this cafe on weekends, so make sure you reach here early to grab a bite!

Last but not the least the Mumbai street food and eateries will be incomplete without a mention to the ice-cream and kulfi joints across Mumbai. Now a days it's very easy to lay one's hands on ice-creams or kulfi's that are practically available at every other shop under the society. But I would like to highlight a Parsi ice cream outlet in the Marine Drive area, near the Brabourne stadium, that have been serving variety of sandwich ice creams for many decades at a very cheap rate. This type of ice cream is hardly available anywhere else in Mumbai. K Rustom's - It is a cute little ice cream shop in the Marine Drive area. Now, this is not your usual ice cream, it is sandwich ice cream - which is a slice of ice cream between two wafer biscuits, and trust me it tastes delicious! This shop has been running more than 60 years and is one of the iconic places in South Mumbai area. They have almost every flavour and it is been everyone's favourite over the years. People dedicatedly come here and have been loyal to this little shop! It tops the list of iconic eateries in Mumbai.

---

**पाठारे प्रभू महिला समाज**

समाजाचा १०८ वा स्थापनादिन दि. १८/९/२२ रोजी खार येथील सांस्कृतिक सभागृहात साजरा होणार आहे. शुभेच्छा.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

* सौ. नेत्रा आणि श्री अजित मोरोबा विजयकर यांजकडून प्रभुतरुणाच्या शताब्दीवर्षप्रारंभाबद्दल रु. २५,०००/-
* प्रभुतरुणाच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ ॲड. सौ. केतकी राजन जयकर यांजकडून रु. ११,०००/-
* इशान आणि निष्का दीपक कोठारेंकडून प्रभुतरुणाच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. १०,०००/-
* प्रभुतरुणाच्या वाढदिवसाप्रित्यर्थ सॉलि. राजन मोतीराम जयकर यांजकडून रु. १०,०००/-
* श्री. सुजन राणे यांजकडून दिवाळीसाठी रु. १०,०००/-
* प्रभुतरुणाच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ सौ. नीता आणि श्री. मिलींद शंकर सेंजित यांजकडून रु. १००१/-
* प्रभुतरुणाच्या शताब्दी पदार्पणानिमित्त (दि. २५/८/१९२२, नारळी पौर्णिमा) आणि कै. शाम विनायक जयकर स्मरणार्थ श्रीम. वृंदा शाम जयकर कडून रु. १०००/-
* सौ. त्वरिता संजय दळवी यांजकडून त्यांची आई श्रीम. प्रभा आणि वडील श्री. सुरेन्द्र एन. व्यवहारकर यांच्या स्मरणार्थ रु. १०००/-

देणगीदारांस शुभेच्छा आणि मन:पूर्वक धन्यवाद.

## अभिनंदन

* सॉलि. राजन जयकर यांची 'मिड डे' मध्ये पाठारे प्रभु संस्कृतीविषयक जुनी भांडी, मटणाचा तराजू आदींच्या छायाचित्रांसह सविस्तर मुलाखत प्रसिद्ध झाली. त्याचप्रमाणे मुंबई विद्यापीठाच्या पदवीदान सभागृहात त्यांच्या मुंबई संदर्भातील छायाचित्रांचे स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रदर्शन भरले आणि पाठोपाठ 'मिड डे' मध्येच पुन्हा त्यांची मुलाखत प्रसिद्ध झाली. एशियाटिक सोसायटीच्या निवडणुकीत ते निवडून आले. 'फ्री प्रेस जर्नल' मध्ये आशुतोष शुक्ला यांच्या लेखात त्यांच्या तांदळाच्या गणपतीचा उल्लेख आहे.
* कु. संजना विशाल व्यवहारकर ही न्यूझिलंडमधील ऑकलंड येथील क्लब पातळीवरील नेट बॉल खेळाडू आहे. त्याचबरोबर ती प्रशिक्षकही आहे. नुकताच तिला नेटबॉल न्यूझिलंड अंपायर सेंटर बॅज प्राप्त झाला. त्यामुळे न्यूझिलंडमधील नॉर्दन डिस्ट्रिक्टमध्ये सोळा प्रिमीयर लीगची ती 'अंपायर' होऊ शकते.
* डॉ. नीलेश विलासचंद्र कोठारे(एमडी, ओसीपी (पाथ), एमबीबीएस) यांनी आयएआरएफ वांद्रे, मुंबई येथून ॲस्ट्रॉलॉजीतील इंटर नॅशनल डिप्लोमा प्राप्त केला ज्याला इस्रो आणि नासा, इतर भारतीय विद्यापीठांची मान्यता आहे.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

## प्रभुतरुणाची डायरी

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १५-८-२२ | श्री. उमाकांत रामराव कोठारे, | वय ८५, | प्रभादेवी |
| १८-८-२२ | श्रीमती अनुराधा जयवंत नायक, | वय ७९, | पुणे |
| २५-८-२२ | श्री. अरुण के. विजयकर | वय ८४, | वांद्रे |




**श्रीनल कोठारेने तयार केलेला प्रभुतरुणाचा बॅकड्रॉप. यावर उपस्थितांनी आपले अभिप्राय नोंदवले.**

कविता

## ''आजोळ''

असावे एक सुरेख आजोळ,
जणू मायेचे भरलेले गोकुळ
असे त्यात आजी, आजोबा प्रेमळ,
नातवंडासाठी त्यांची असे तळमळ,
आम्ही म्हणजे त्यांची दुधावरची साय,
सारा वेळ त्यांचा आमच्यासाठीच जाय.
मामा, मावशी असणे एक सुंदर योग,
मायेने करती आम्हासाठी कित त्याग.
दुसरी माय जणू असे त्यात मावशी,
तिचे प्रेम असे आम्हावरी बावनकशी
मामा म्हणजे आमचा जीव की प्राण,
त्याच्या संगे येते आनंदास उधाण.
पंगोजी, भानवले अजूनही रेंगाळती मनी,
करंदी पोह्याची मजा सांगता यायची नाही जनी.
भाग्यवान ते ज्यास लाभे असे आजोळ,
जणू मायेचे भरलेले गोकुळ.

**- सौ. निकेता प्रशांत राणे**

### परीक्षेतील सुयश

**बीएमसी (ऑकलंड युनिव्हर्सिटी)**
कु. संजना विशाल व्यवहारकर
**इंटरनॅशनल डिप्लोमा कोर्स स्टडी इन ॲस्ट्रॉलॉजी**
डॉ. नीलेश विलासचंद्र कोठारे 'ए' ग्रेड
**आयसीएसई (दहावी)**
श्री. रोमिर राहुल नवलकर ९०.५ %

### चुकीची दुरुस्ती

गेल्या अंकात पा. प्र. सोशल समाजाच्या वृत्तान्तामध्ये किरण आगासकर असे छापले गेले आहे. ते राहुल किरण आगासकर असे हवे. तसेच याच बातमीत विश्वस्त श्रीम. वृंदा राणे छापले गेले आहे. ते श्रीमती वृंदा जयकर असे हवे. मुद्रणदोषाबद्दल दिलगीर आहोत.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर** RNI NO. 14613/67